## सारणी क्रमांक १.२

### कोल्हापूर शहरातील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या (१९८७-८८)

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थिनी संख्या |
|---|---|---|
| १. | राजाराम महाविद्यालय | २०५ |
| २. | गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय | १४९ |
| ३. | देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार वाणिज्य महाविद्यालय | ५३८ |
| ४. | यशवंतराव चव्हाण महाविद्यालय | १५२ |
| ५. | कमला महाविद्यालय | ३९६ |
| ६. | महावीर महाविद्यालय | ८४ |
| ७. | श्री. शहाजी छत्रपती महाविद्यालय | १७० |
| ८. | शाहू महाविद्यालय | ३८ |
| ९. | विवेकानंद महाविद्यालय | १३६ |
| १०. | न्यू कॉलेज | ६६२ |
| | एकूण | २५३० |

उगम : सांख्यिकी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सारणी क्र. १.३

**कोल्हापूर शहरात पदव्युत्तर विभागात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या (१९८७-८८)**

| अ.क्र. | | विद्यार्थीनी संख्या |
|---|---|---|
| १) | शिवाजी विद्यापीठ | |
| | एम.ए. भाग-१ | ७१ |
| | एम.ए. भाग-२ | ५१ |
| | एम.एस्सी. भाग-१ | ८८ |
| | एम.एस्सी. भाग-२ | ६४ |
| | एम.कॉम. भाग-१ | १४ |
| | एम.कॉम. भाग-२ | १३ |
| २) | श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय | |
| | एम.कॉम. भाग-१ | १४ |
| | एम.कॉम. भाग-२ | ३ |
| ३) | छ.शाहू सेंट्रल इन्स्टिटयुट ऑफ बिझनेस एज्युकेशन,ॲन्ड रिसर्च | |
| | एम.कॉम. भाग-१ | ३७ |
| | एम.कॉम. भाग-२ | १० |
| | एकूण : | ३६५ |

उगम : सांख्यिकी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

वरील सारणी क्रमांक १.२ व सारणी क्रमांक १.३ वरून असे म्हणता येईल की कोल्हापूर शहरात महाविद्यालयीन स्तरावर शिक्षण घेणाऱ्या एकूण विद्यार्थिनींची संख्या २५३० आहे. व पदव्युत्तर विभागात शिक्षण घेणाऱ्या एकूण विद्यार्थिनींची संख्या ३६५ आहे. महाविद्यालयीन स्तरावरील २०० विद्यार्थिनी व पदव्युत्तर स्तरावरील ५० विद्यार्थिनी हे प्रमाण एकूण विद्यार्थिनींच्या अनुक्रमे ७.९ टक्के व १३.६ टक्के आहे. म्हणून ही संख्या एकूण विद्यार्थिनींचे प्रतिनिधीत्व करण्यास पुरेशी आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

२) <u>मुलाखती व गटवार चर्चा</u> :

प्रश्नावलीद्वारे मिळालेली माहिती यथार्थ व विश्वासार्ह आहे की नाही हे पडताळून पाहण्यासाठी विविध महाविद्यालयातील पंचवीस विद्यार्थिनींच्या मुलाखती घेतल्या आणि विद्यार्थिनींशी गटवार चर्चा केल्या. मुलाखतीतील प्रश्न प्रश्नावलीला अनुसरून होते. मुलाखतीमुळे समस्येच्या संदर्भात विद्यार्थिनींनी आपले विचार मनमोकळेपणाने व्यक्त केले. तसेच संबंधित विद्यार्थिनींशी गटवार चर्चा करून त्यांच्या शैक्षणिक समस्यांच्या संदर्भात त्यांची मते, विचार, अभिप्राय आजमावण्यात आले.

३) <u>प्रत्यक्ष भेटी व निरीक्षण</u> :

प्रश्नावली व मुलाखतद्वारा जी माहिती गोळा केली तिची आणखी एकदा यथार्थता आणि विश्वासार्हता पाहण्यासाठी संशोधिकेने प्रत्यक्ष महाविद्यालयांना भेटी दिल्या व निरीक्षण केले.

या विविध साधनांद्वारे गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण करून अन्वयार्थ त्या त्या प्रकरणात लावलेला आहे. तसेच या

अन्वयार्थाच्या आधारे योग्य ते निष्कर्ष काढले. या निष्कर्षांचा एकत्र सुत्रबध्द विचार करून प्रस्तुत समस्येच्या संदर्भात कोणती उपाययोजना करणे शक्य आहे व आवश्यक आहे ते शिफारशीद्वारा स्पष्ट केले.

१.८ <u>प्रकरणीकरण</u> :

अशाप्रकारे संकलित केलेल्या सामग्रीचे वर्गीकरण व पृथ:करण करून तसेच अन्वयार्थ लावून त्यावरील आधारित निष्कर्ष व तदनुषंगाने केलेल्या शिफारशी पुढे निर्देशित केलेल्या प्रकरणातून मांडल्या आहेत.

<u>प्रकरण एक - विषयप्रवेश</u> -

या प्रकरणामध्ये ही समस्या कशी निर्माण झाली याचा ऊहापोह करून समस्येचे शब्दांकन केले आहे. संशोधनाचे महत्व, उद्दिष्टे व मर्यादा स्पष्ट केली आहे. तसेच कोणती संशोधनपध्दती उपयोजिली आहे हे नमूद केलेले आहे. थोडक्यात हे प्रकरण संशोधनाची पार्श्वभूमी स्पष्ट करणारे आहे.

<u>प्रकरण दोन</u> - <u>भारतातील स्त्रीशिक्षणाचा संक्षिप्त इतिहास</u> -

वेदकालीन तसेच सूत्र व स्मृतीकाळातील स्त्रियांचे शिक्षण, पौराणिक काळातील स्त्रियांचे शिक्षण, मध्ययुगीन कालखंडातील स्त्रीशिक्षण, स्वातंत्र्यपूर्व ऐतिहासिक काळातील स्त्रियांचे शिक्षण व स्वातंत्र्यानंतरच्या काळातील स्त्रियांचे शिक्षण यांचा थोडक्यात आढावा या प्रकरणात घेतला आहे. तसेच स्त्रीशिक्षणाची सद्य:स्थिती विशद करून, नवीन शैक्षणिक धोरणातील स्त्रीशिक्षणाविषयीच्या योजनांचे विवेचन केले आहे.

ड  प्रकरण तीन - संशोधन विषयाशी संबंधित संशोधित साहित्याचा आढावा -

प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाशी संबंधित प्रकाशित आणि अप्रकाशित संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. हा आढावा सैध्दान्तिक पार्श्वभूमी म्हणून उपयुक्त आहेच परंतुरत्यापेक्षा आतापर्यन्त या क्षेत्रात संशोधन विषयाशी संबंधित कोणते संशोधन झाले आहे, कोणत्या प्रकारची सामग्री गोळा करण्यात आली, गोळा केलेल्या सामग्रीचे कशाप्रकारे वर्गीकरण, विश्लेषण करण्यात आले, अन्वयार्थ कसा लावण्यात आला आणि कोणत्या शिफारशी करण्यात आल्या याविषयी ऊहापोह केला आहे.

प्रकरण चार - महाविद्यालयीन स्तरावरील मुलींच्या समस्या -

या प्रकरणात कला, वाणिज्य व शास्त्र या शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष या वर्गात शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या समस्यांचे वर्गीकरण, पृथःक्करण करून अन्वयार्थ लावला आहे.

प्रकरण पाच - पदव्युत्तर विभागातील मुलींच्या समस्या -

या प्रकरणात पदव्युत्तर विभागातील एम्.ए., एम्.कॉम., एम्.एस्सी. या वर्गात शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या समस्यांचे वर्गीकरण, पृथःक्करण करून अन्वयार्थ लावला आहे.

## प्रकरण सहा - निष्कर्ष व शिफारशी :

या प्रकरणामध्ये प्रकरण क्रमांक तीन व चारमध्ये गोळा केलेल्या सामग्रीच्या अन्वयार्थाच्या साहाय्याने निष्कर्ष काढले आहेत. या निष्कर्षांवर आधारित शिफारशींचा निर्देश केला आहे.

तसेच प्रस्तुत संशोधन विषयाशी प्रत्यक्षपणे निगडित नसलेल्या तथापी उपयुक्त ठरणाऱ्या काही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश केलेला आहे.